मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ‘ना हरकत’ प्रमाणपत्राची ऑनलाईन प्रणाली यशस्वी

## पिंपरी चिंचवड महापालिकेचा निवडणुकीसाठीचा पहिला प्रयोग यशस्वी

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ साठी प्रथमच उमेदवारी अर्जासोबत आवश्यक असणाऱ्या ना हरकत प्रमाणपत्र (NOC) देण्यासाठी ऑनलाईन प्रणाली राबविण्यात आली असून, ही प्रणाली अत्यंत यशस्वी ठरल्याचे उपायुक्त राजेश आगळे यांनी सांगितले.

मागील निवडणुकांमध्ये ना हरकत प्रमाणपत्र देताना मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ लागत होते तसेच विलंब होत असल्याने उमेदवारांची अडचण होत होती. ही अडचण दूर करण्यासाठी महापालिकेने



यावेळी PCMCINDIA.GOV.IN या संकेतस्थळावरून थकबाकी ना हरकत प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज प्रणाली सुरू केली.

या प्रणालीद्वारे महापालिकेच्या एकूण ९४ खात्यांना एकत्र जोडण्यात आले असून, उमेदवाराचा अर्ज एकाच वेळी सर्व खात्यांना पाठविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.३० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत या ऑनलाईन प्रणालीद्वारे १,१८,१७७ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी खात्यांच्या शिफारशीनुसार ५०१ अर्ज बाद करण्यात आले असून, २००४ अर्जदारांना ऑनलाईन ना हरकत प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

विशेष म्हणजे, या कक्षाद्वारे सरासरी २४ तासांच्या आत ना हरकत प्रमाणपत्र वितरित करण्यात आली. निवडणुकीपूर्वीच्या शेवटच्या दोन दिवसांत तर सरासरी ४ तासांच्या आत प्रमाणपत्र देण्यात आल्याची माहिती महापालिकेने दिली. या प्रणालीमुळे इच्छुक उमेदवारांची दमछाक मोठ्या प्रमाणात कमी झाली असून, बहुतांश अर्जदारांनी या संगणक प्रणालीबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रणाली यशस्वीपणे राबविण्यात आली असल्याचे उपायुक्त राजेश आगळे यांनी सांगितले.

# मतदान करण्याचा नववर्षात संकल्प करा; आयुक्त श्रावण हर्डीकर

## आकुर्डीतील ‘सखी आंगण’ येथे स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती उपक्रम उत्साहात

**पिंपरी | प्रतिनीधी**

भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेला मतदानाचा हक्क केवळ अधिकार नसून तो प्रत्येक जागरूक नागरिकाची जबाबदारी आहे. प्रत्येक निवडणुकीत मतदान केल्याने लोकशाही अधिक सक्षम होते. २०२६ हे नववर्ष आता सुरू होत आहे. या नववर्षात प्रत्येक निवडणुकीत नियमितपणे मतदान करण्याचा ठाम संकल्प करून याची सुरुवात येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीतून करा, असे आवाहन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी केले. नागरिकांचा सक्रिय सहभागच सक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी लोकशाही घडवू शकतो, असेही त्यांनी नमूद केले.



> महिलांनी आणि युवकांनी पुढाकार घेऊन मतदान केल्यास समाजातील सकारात्मक बदल अधिक वेगाने घडू शकतात. प्रत्येक मत हे लोकशाहीचा पाया मजबूत करणारे असते.
>
> **- तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त**

> सखी आंगणसारखे उपक्रम महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासोबतच सामाजिक जाणीव आणि आत्मविश्वास वाढवण्याचे महत्त्वाचे माध्यम ठरतात. आर्थिक स्वावलंबनासोबत लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला, तर समाज अधिक सक्षम आणि समतोल बनेल. त्यामुळे सखी आंगण येथे घेतलेला मतदान जनजागृती उपक्रमाचे विशेष महत्त्व आहे.
>
> **- ममता शिंदे, उपायुक्त**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती उपक्रम शहरातील विविध भागांत राबवण्यात येत आहेत. या अंतर्गत आज महापालिकेच्या समाज विकास विभागाने आकुर्डी रेल्वे स्टेशन परिसरात उभारलेल्या ‘सखी आंगण’ येथे मतदान जनजागृती उपक्रम घेण्यात आला,त्यावेळी आयुक्त हर्डीकर बोलत होते.

महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे, उपायुक्त ममता शिंदे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महिला बचत गटांतील महिला यावेळी उपस्थित होत्या.

### मतदानाची शपथ

आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू. तसेच प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू, अशी मतदानाची शपथ यावेळी उपस्थितांना देण्यात आली.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत पंचरंगी लढत

## ईव्हीएम मशिन्सच्या सुरक्षितता, साठवणूक व वाहतुकीबाबत अधिकाऱ्यांना कडक सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक भाजप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला (आठवले गट) बरोबर लढणार आहे. शिवसेना (शिंदे) पक्ष स्वबळावर निवडणूक लढणार आहे. महाविकास आघाडीतील काँग्रेस स्वबळावर लढणार असून, शिवसेना (ठाकरे)-मनसेची युती झाली आहे. दिवसभराच्या राजकीय घडामोडींनंतर पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी, काँग्रेस, शिवसेना (शिंदे), शिवसेना (ठाकरे)-मनसे युती अशी पंचरंगी लढत होणार आहे.

महापालिका निवडणुकीसाठी भाजप, शिवसेना (शिंदे) आणि रिपाइं हे तीन पक्ष महायुतीमध्ये एकत्रित लढण्याबाबत बोलणी सुरू होती. शिवसेनेने भाजपकडे २९ जागांची मागणी केली होती. पहिल्या बैठकीत १६, त्यानंतर १३ जागा देण्याबाबत चर्चा झाली. सोमवारी शेवटच्या बैठकीत शिवसेनेने दहा जागांची मागणी केली. परंतु, याबाबत सकारात्मक चर्चा झाली नाही. इच्छुकांनी अर्ज दाखल केल्याचे भाजपकडून सांगण्यात आले. मंगळवारी दुपारी अर्ज भरण्यास अडीच तास शिल्लक असताना साडेबारा वाजता युती होणार नसल्याचे स्पष्ट झाले.

### युती तुटल्याचे दुःख

शिवसेना (शिंदे) – भाजप पक्षाची पारंपरिक युती आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीत युती व्हावी, यासाठी पुढाकार घेतला होता. दुपारपर्यंत आमदार शंकर जगताप यांच्या संपर्कात होतो. परंतु, कार्यकर्ते ऐकत नसल्याचे त्यांनी सांगितले. युती तुटल्याचे वाईट वाटत आहे. २०१७ मध्येही ऐनवेळी दोन्ही पक्ष स्वतंत्र लढले. पण, संबंधांमध्ये कटुता आली नाही. टीका-टिप्पणी, रोष, आरोप करणार नसल्याचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले.

### काँग्रेस स्वबळावर

काँग्रेसची शिवसेना (ठाकरे), वंचित बहुजन आघाडीसोबतचीही चर्चा अयशस्वी झाली. त्यामुळे काँग्रेसने स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. ६० जागांवर उमेदवारीअर्ज दाखल केल्याचे वरिष्ठ उपाध्यक्ष मयूर जयस्वाल यांनी सांगितले.

### दोन्ही 'राष्ट्रवादी'ची आघाडी

» दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र निवडणूक लढवत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष ११० आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्ष १८ जागांवर निवडणूक लढवत आहे. प्रभाग क्रमांक नऊ आणि २० मध्ये एकमत झाले नाही. त्यामुळे या दोन ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे कार्याध्यक्ष फजल शेख यांनी सांगितले.

### शिवसेना (ठाकरे)-मनसे-रासपची युती

» प्रभाग क्रमांक २२ वरून काँग्रेस-शिवसेना (ठाकरे) पक्षाची युती तुटली. शिवसेना (ठाकरे)- मनसे आणि राष्ट्रीय समाज पक्षाची युती झाली आहे. शिवसेना ६०, मनसे १७ आणि रासपने एका जागेसाठी उमेदवारीअर्ज दाखल केला असल्याचे शिवसेना (ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख गौतम चाबुकस्वार यांनी सांगितले. कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे शिवसेना (शिंदे) पक्षासोबत युती होऊ शकली नाही. भाजप आणि रिपाइं एकत्र निवडणूक लढविणार आहेत. रिपाइंला पाच जागा दिल्या असून, त्यांचे उमेदवार कमळ चिन्हावर निवडणूक लढविणार आहेत, असे भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी सांगितले.

# माजी आमदार गौतम चाबुकस्वारांवर लैंगिक छळाचा आरोप

## तिकीट कापल्यामागे शरीरसुखाची मागणी कारणीभूत असल्याचा सुषमा शेलार यांचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

"जे दाखवायचं ते दाखवत नाहीस" असे बोलून पिंपरीचे माजी आमदार गौतम चाबुस्कावर यांनी महानगरपालिका निवडणुकीचे तिकीट कापल्याचा आरोप शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या पिंपरी विधानसभा समन्वयक सुषमा शेलार यांनी पिंपरी येथे (दि.३१) पत्रकार परिषदेत केला आहे.



पत्रकार परिषदेत बोलताना शेलार म्हणाल्या की,शिवसेनेमध्ये गेले आठ वर्ष झाले काम करत असून पिंपरी विधानसभा समन्वयक म्हणून पक्ष वाढीसाठी काम केले आहे. पक्ष न्याय देईल या हेतूनेच प्रभागांमध्ये अनेक उपक्रम राबवले व अनेक समाज उपयोगी कामे केली आहेत. कामे करत असताना पक्षाचे माजी आमदार गौतम चाबुकस्वार यांनी वारंवार शारीरिक मागणी करून हीन वागणूक दिली आहे. कामानिमित्त त्यांच्या पिंपरीतील कार्यालयात भेटण्यासाठी अनेक वेळा गेले तेव्हा त्यांनी अश्लील नजरेतून बघत "खूप छान दिसतेस, आज साडी चांगली आहे" म्हणत जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. पक्षाचे काम न करणाऱ्या निष्क्रीय गोपाळ मोरे या कार्यकर्त्याला तिकीट न दिल्यास राजीनामा देण्याचा दबाव पक्षावर चाबुस्कावर यांनी आणला. एका कार्यकर्तासाठी जिल्हा प्रमुख राजीनामा देतो का? या गोष्टीचा पक्षाने विचार करावा? पक्षाला वेठीस का धरले होते ? याचा खुलासा मी मीडिया समोर केला आहे.

> "गेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी कासारवाडी येथे प्रचार करत असताना एका बिल्डिंगमध्ये प्रचारासाठी गेलो असता लिफ्टमध्ये त्यांनी मागून पकडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पोलिसात धाव घेण्यासाठी प्रयत्न केले परंतु चाबूस्वार यांनी तुला आयुष्यातून उठवेल अशी धमकी दिली. त्यामुळे घाबरून या घटनेची कुठेही वाच्यता केली नाही. काही दिवसांपूर्वी आकुर्डी येथील शिवसेना कार्यालयामध्ये बैठकीनिमित्त गेले असता तिथे त्यांना "पक्षांमध्ये काम केले आहे आता किती काम दाखवू" असे बोलले असता त्यांनी "जे दाखवायचे ते दाखवत नाही" असे अश्लील हावभाव करून शरीर सुखाची मागणी केली. मागील आठवड्यात कामानिमित्त महानगरपालिकेत गेले असता अचानक चाबुकस्वार यांची भेट झाली तेव्हा त्यांना "तिकटासाठी अडवणूक करू नका, निवडून आल्यास जिल्हा प्रमुख म्हणून तुमचेच नाव होणार आहे" असे बोलले होते. त्यावर चाबुकस्वार यांनी "तुला पहिल्यापासून सांगत आलोय कॉम्प्रोमाइज कर तिकीट फिक्स होईल" असे बोलून अप्रत्यक्षरीत्या शरीर सुखाची मागणी केली. सततच्या मागण्यांना नकार देत आल्यामुळेच तिकीट कापले आहे असे मत शेलार यांनी व्यक्त केले.
>
> **- सुषमा शेलार. पिंपरी.**

# पुण्यात भाजपचा नवा फॉर्म्युला; 2017 मधील विद्यमान नगरसेवकांचा पत्ता कट

## एबी फॉर्मवर गुप्तता, प्रभागरचना व आरक्षणाचा फटका; नव्या चेहऱ्यांना मोठी संधी

**पुणे | प्रतिनिधी**

भाजपने उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत एबी फॉर्मबाबत कमालीची गुप्तता पाळली. यंदाच्या निवडणुकीत भाजपमध्ये सर्वाधिक इच्छुकांची संख्या होती. त्यामुळे या वर्षी भाजपने उमेदवारी देताना नवा फॉर्म्युला अवलंबत 2017 मध्ये निवडून आलेल्या तब्बल 40 ते 50 जागांवर निवडून आलेल्या विद्यमान नगरसेवकांच्या जागेवर नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. पक्षाच्या उच्च पातळीवरील चर्चेनंतर अंतिम झालेले हे चित्र अनेकांना धक्का देणारे असले तरी कार्यकर्त्यांमध्ये नवी उमेद निर्माण करणारे आहे.

पुणे महानगरपालिकेची रणधुमाळी सुरू झाली आहे. मंगळवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता. यावर्षी भाजपमधून इच्छुकांची संख्या जास्त असल्याने नेमकी उमेदवारी कुणाला मिळणार याकडे लक्ष होते. तब्बल अडीच हजार इच्छुकांच्या मुलाखती घेऊन प्रभागनिहाय सर्वेक्षण देखील करण्यात आले होते. दरम्यान, या वर्षी प्रामुख्याने बदललेली प्रभागरचना, त्यामधील आरक्षणे, यामुळे बदललेली गणिते आणि काही माजी नगरसेवकांची अकार्यक्षमता, या कारणांमुळे अनेकांना घरी बसावे लागणार असे चित्र होते, तर काहींना थांबवत नव्यांना संधी देण्याचे तंत्र भाजपने अवलंबवले.

भाजपच्या 2017 च्या निवडणुकीत 90 नगरसेवक निवडणूक आले होते. यातील तब्बल 40 ते 50 विद्यमान नगरसेवकांना उमेदवारी पक्षाने नाकारली आहे. त्यांच्या जागेवर नव्या चेहऱ्यांना पक्षाने संधी दिली आहे. 2017 च्या रचनेत व नव्या रचनेत काही प्रभाग एकमेकांत मिसळले गेले आहेत. त्यामुळे देखील विद्यमानांना फटका बसला आहे. त्यात गेल्या काही दिवसांत भाजपमध्ये जोरदार इनकमिंग झाले आहे. यामुळे देखील काही विद्यमान नगरसेवकांना उमेदवारी पक्षाने नाकारली आहे. भाजपने उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत एबी फॉर्मबाबत कमालीची गुप्तता पाळली. यंदाच्या निवडणुकीत भाजपमध्ये सर्वाधिक इच्छुकांची संख्या होती. त्यामुळे या वर्षी भाजपने उमेदवारी देताना नवा फॉर्म्युला अवलंबत 2017 मध्ये निवडून आलेल्या तब्बल 40 ते 50 जागांवर निवडून आलेल्या विद्यमान नगरसेवकांच्या जागेवर नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे.




### या विद्यमानांना नाकारले!

» ऐश्वर्या जाधव, मारुती सांगळे, आयुब शेख, श्वेता गलांडे-खोसे, मुक्ता जगताप, सुनीता गलांडे, संदीप जराड, सोनाली लांडगे, राजश्री काळे, आदित्य माळवे, सुनीता वाडेकर, अर्चना मुसळे, बंडू ढोरे, स्वप्नाली सायकर, ज्योती कळंबकर, अमोल बालवडकर, श्रद्धा प्रभुणे, हर्षाली माथवड, दीपक पोटे, माधुरी सहस्त्रबुद्धे, जयंत भावे, स्वाती लोखंडे, नीलिमा खाडे, ज्योत्स्ना एकबोटे, राजेश येनपुरे, योगेश समेळ, सुलोचना कोंढरे, विजयालक्ष्मी हरिहर, आरती कोंढरे, समाट थोरात, मनीषा लडकत, संजय घुले, कविता वैरागे, राजश्री शिळीमकर, प्रवीण चोरबोले, सरस्वती शेंडगे, आनंद रिठे, शंकर पवार, वृषाली चौरे, नीता दांगट, राजश्री नवले, दिशा माने.

### काही माजी नगरसेवकांचे प्रमोशन

» लोकसभा, विधानसभा निवडणुकीत काही नगरसेवकांचे प्रमोशन झाल्याने त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. यात माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांचा समावेश आहे. लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्यावर ते खासदार झाले. त्यानंतर त्यांची थेट वर्णी केंद्रीय मंत्रीपदी लागली, तर माजी नगरसेवक सिद्धार्थ शिरोळे हे शिवाजीनगर मतदारसंघातून विधानसभा निवडणुकीत निवडून आले. माजी स्थायी समिती अध्यक्ष हेमंत रासने कसबा विधानसभा मतदारसंघातून निवडून आल्याने ते आमदार झाले.

### नव्या चेहऱ्यांना संधी

» यंदाच्या निवडणुकीत भाजपमध्ये सर्वाधिक इच्छुकांची संख्या होती. त्यामुळे या वर्षी भाजपने उमेदवारी देताना नवा फॉर्म्युला अवलंबत 2017 मध्ये निवडून आलेल्या तब्बल 40 ते 50 जागांवर निवडून आलेल्या विद्यमान नगरसेवकांच्या जागेवर नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. पक्षाच्या उच्च पातळीवरील चर्चेनंतर अंतिम झालेले हे चित्र अनेकांना धक्का देणारे असले तरी कार्यकर्त्यांमध्ये नवी उमेद निर्माण करणारे आहे.

# परवानगी' अतिरिक्त आयुक्तच देणार, जाहिरात फलकावर कारवाईचे अधिकार मात्र क्षेत्रीय कार्यालयांनाच

## महापालिका आयुक्तांनी हे अधिकार क्षेत्रीय कार्यालय स्तरावर महापालिका सहाय्यक आयुक्तांसह, परिमंडळ उपायुक्तांना दिले होते.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात जाहिरात फलक उभारण्याचे अधिकार पुन्हा महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांकडे देण्यात आले आहेत. प्रशासकीय कामकाज गतिमान करण्यासाठी महापालिका आयुक्तांनी हे अधिकार क्षेत्रीय कार्यालय स्तरावर महापालिका सहाय्यक आयुक्तांसह, परिमंडळ उपायुक्तांना दिले होते. मात्र, अधिकार मिळताच महिन्याभरातच तब्बल ४०० हून अधिक परवाने क्षेत्रीय कार्यालयांनी दिले असल्याचे समोर आल्यानंतर महापालिका आयुक्तांकडून तत्काळ हे अधिकार काढून घेण्यात आले आहेत.

क्षेत्रीय कार्यालयांना हे अधिकार देण्यापूर्वी महापालिका वर्षभरात केवळ २० ते २२ जाहिरात फलकांना परवानगी देत होती. आता नवीन बदलानुसार, अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड फ्लेक्स, झेंडे, तसेच आकाशचिन्ह विभागाशी संबंधित बाबींवर कारवाई करण्याचे अधिकार क्षेत्रीय कार्यालयांकडे कायम असणार आहेत.

अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, किऑस्क, भित्तिपत्रके व पोस्टर्सबाबत मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिकेनुसार महापालिका सहाय्यक आयुक्त हे जबाबदार व अंमलबजावणी अधिकारी राहतील. उपआयुक्त परिमंडळ क्र. १ ते ५ हे नोडल व पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून कामकाज पाहणार आहेत. अनधिकृत फलकांवरील कारवाईमध्ये कसूर आढळून आल्यास संबंधित सहाय्यक आयुक्त व उपआयुक्त परिमंडळावर कायदेशीर कारवाई केली जाईल.



### काय आहेत सुधारीत आदेश

» यापुढील नवीन जाहिरात फलक परवानगी प्रस्ताव परवाना निरीक्षक यांच्यामार्फत उपआयुक्त, परवाना व आकाशचिन्ह विभाग यांनी अतिरिक्त महापालिका आयुक्त (ई) यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करावेत. नवीन नामफलक परवानगी प्रस्ताव परवाना निरीक्षकांनी थेट उपआयुक्त, परवाना व आकाशचिन्ह विभाग यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केले जातील. अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, किऑस्क, भित्तिपत्रके व पोस्टर्सबाबत मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिकेनुसार महापालिका सहाय्यक आयुक्त हे जबाबदार व अंमलबजावणी अधिकारी राहतील. उपआयुक्त परिमंडळ क्र. १ ते ५ हे नोडल व पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून कामकाज पाहणार आहेत. अनधिकृत फलकांवरील कारवाईमध्ये कसूर आढळून आल्यास संबंधित सहाय्यक आयुक्त व उपआयुक्त परिमंडळावर कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आंबेगाव तालुक्यात पुन्हा राजकीय भूकंप

## माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील स्वगृही परतणार?

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर लोकसभेची उमेदवारी मिळावी म्हणून 2024 साली शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलेले माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांचे मन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात रमत नसल्याचे संकेत मिळत आहेत. आढळराव पाटील यांची सध्याची राजकीय परिस्थिती आणि भवितव्य पाहता ते पुन्हा शिवसेनेत स्वगृही परतणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून समजते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांच्या बरोबरीने गेली दोन वर्ष पक्षाचे काम करत असताना आढळराव पाटील यांचा राजकीय आलेख कमी होत चालला असल्याचे दिसून आल्यामुळेच त्यांनी पुन्हा स्वगृही परतण्याचा निर्णय घेतला असावा, असा राजकीय तज्ज्ञांना अंदाज आहे.

2004 साली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून शिवसेनेमध्ये प्रवेश करून शिवाजीराव आढळराव पाटील यांनी प्रथम शिरूर लोकसभेची निवडणूक लढवली. आपल्या पहिल्याच खासदारकीच्या निवडणुकीत पुणे जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बालेकिल्ल्यात आढळराव पाटील विजयी झाले. सलग तीन वेळा शिरूर लोकसभेचे प्रतिनिधित्व करणारे आढळराव पाटील शिवसैनिकांच्या मनात भरले. पश्चिम महाराष्ट्रातील शिवसेना तारण्याचे काम खऱ्या अर्थाने आढळराव पाटील यांनी केले.

दरम्यान 2019 साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत आढळराव पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ.अमोल कोल्हे यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. मात्र, पराभवानंतर देखील शिवाजीराव आढळराव पाटील यांनी आपल्या लांडेवाडी येथील निवासस्थानी असणारा प्रत्येक रविवारी भरणारा जनता दरबार चालूच ठेवला आणि ते सातत्याने लोकसंपर्कात राहिले आणि अद्यापही आहेत. दरम्यानच्या कालखंडात उद्धव ठाकरे यांच्या दरबारात आढळराव पाटील यांना मानाचे स्थान मिळत नसल्याने त्यांनी, एकनाथ शिंदेंच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेत प्रवेश केला आणि शिंदेंचे विश्वासू सहकारी म्हणून आढळराव पाटील पश्चिम महाराष्ट्रात परिचित झाले.



### आढळराव पाटील यांना राजकीय धक्का

» प्रत्यक्षात मंचरचा नगरपंचायतीचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार हा शिवसेनेचा निवडून आला. त्यामुळे आढळराव पाटील यांना राजकीय धक्का बसल्याचे देखील मानले जात आहे. भविष्यकाळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षापेक्षा शिवसेना पक्षातच आपली मोठी राजकीय ताकद राहील, असेही कदाचित आढळराव पाटील यांना वाटत असावे.दरम्यान आढळराव पाटील यांच्याप्रमाणेच आंबेगाव तालुक्यातील एका माजी आमदाराचा नातू देखील शिवसेनेत प्रवेश करण्याच्या मार्गावर असल्याच्या चर्चा तालुक्यात झडत आहेत.

### पवार, वळसे पाटलांबरोबरच्या चर्चेनंतरच प्रवेश

» शिवसेना प्रवेशाबाबत माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, मंचर नगर पंचायतीच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मोनिका सुनील बाणखेले या माझ्या विचाराच्या उमेदवार होत्या. नगरपंचायत निवडणुकीत त्यांचा झालेला पराभव हा क्रॉस वोटींगमुळे झाला. पराभवानंतर माझ्या कार्यकर्त्यांशी बैठक झाली. त्या बैठकीत माझ्या कार्यकर्त्यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली. माझ्या आगामी राजकीय राजकारणासंबंधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार आणि दिलीप वळसेपाटील यांच्या बरोबर बोलणार आहे.

### पुणे जिल्ह्यात शिवसेनेला चांगले यश

» भाजपा-शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशी महायुती असल्याने शिरूर लोकसभेची उमेदवारी साहजिकच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे गेली. त्यामुळे उमेदवारी मिळण्यासाठी आढळराव पाटील यांनी पुन्हा शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. गेली दीड, दोन वर्ष ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कामकाज अत्यंत इमाने – इतबारे करत आहेत. दरम्यानच्या कालखंडात नुकत्याच नगरपंचायत आणि नगरपरिषदेच्या निवडणुका पार पडल्या. झालेल्या निवडणुकांमध्ये उत्तर पुणे जिल्ह्यात शिवसेनेला चांगले यश मिळाले.

# भीमाशंकर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी


## राज्यासह देशभरातून भाविक मोठ्या संख्येने भीमाशंकरात दाखल होत आहेत, परिणामी संपूर्ण परिसरात गर्दीचे चित्र दिसून येत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भीमाशंकर येथील मंदिर शुक्रवार, दि.२ जानेवारीपासून पुढील विकासकामांसाठी बंद राहणार असल्याची माहिती समोर आल्यानंतर ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी वाढली आहे. "गर्दीमुळे प्रशासनावरही भाविकांना सुरक्षित सेवा देण्यासाठी ताण येत आहे.

मंदिर बंद होण्यापूर्वी दर्शन घ्यावे," या भावनेतून राज्यासह देशभरातून भाविक मोठ्या संख्येने भीमाशंकरात दाखल होत आहेत. परिणामी संपूर्ण परिसरात गर्दीचे चित्र दिसून येत आहे. भाविकांची संख्या वाढल्याने सर्व पार्किंग स्थळे पूर्णपणे भरली असून अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला वाहने उभी राहिल्याचे चित्र आहे. पार्किंग स्थळांपासून मंदिरापर्यंत जाण्यासाठी एसटी बससेवेची मोठी कमतरता जाणवत असून भाविकांना पायी प्रवास करावा लागत आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांचे हाल होत आहेत.

भीमाशंकर–घोडेगाव, मंचर तसेच इतर मार्गांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने भाविकांचा वेळ व संयम दोन्ही संपत चालले आहेत. गर्दी नियंत्रणासाठी पोलीस व प्रशासनाचे कर्मचारी प्रयत्न करत असले तरी अचानक वाढलेल्या गर्दीपुढे प्रशासनही काहीसे हातबल झाल्याचे दिसून येत आहे. वाहतूक कोंडी, पार्किंगचा प्रश्न, अपुरी वाहतूक व्यवस्था आणि दर्शनासाठी लागणारा वेळ यामुळे भाविकांसह पोलीस प्रशासनाचीही डोकेदुखी वाढली आहे. प्रशासनाने योग्य नियोजन, अतिरिक्त बससेवा व वाहतूक नियंत्रणाच्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी भाविकांकडून होत आहे.



> मंदिर बंद होणार असल्याची बातमी ऐकून खास दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येऊ लागले आहे. मात्र, प्रचंड गर्दी, वाहतूक कोंडी आणि बससेवेअभावी खूप त्रास होत आहे. प्रशासनाने सर्व खबरदारी घेऊन भाविकांना उत्तम सेवा द्यावी.
>
> - रमेश येवले, उद्योजक, गंगापूर.

> भीमाशंकरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी वाढली आहे. भाविकांना दर्शनाची ओढ मोठी आहे, पण पार्किंग व वाहतुकीचा गोंधळ पाहून अडचणी वाढल्या. प्रशासनाने अधिक चांगली व्यवस्था करावी.
>
> - तुलसी सचिन भोर, माजी जिल्हा परिषद सदस्या चास.